Tele – 7249250184/2120

AIT/0323/CNO/Prin

05 Feb 2021

## OFFICE OF PRINCIPAL

## COMMENCEMENT OF PHYSICAL TEACHING AT AIT

1. As per the GR issued by Higher & Technical Education Dept, Maharashtra State, GR No. संकीर्ण 2021/ प्र.क्र. 6/ विशि -3 dated 03 Feb 2021 & Savitribai Phule Pune University Circular No. 34/2021 dated 04 Feb 2021 (copy attached to forwarded email). It is decided to start classes / practical in Offline / online mode.

2. All students of AIT will report as per following schedule :-

| Sr. No. | Year | Branch | Date |
|---|---|---|---|
| 1. | ME - I | Mech | 08 Feb |
| 2. | SE / TE / BE | E&TC | 10 – 15 Feb |
| 3. | SE / TE / BE | Mech | |
| 4. | SE | Comp | 25 – 28 Feb |
| 5. | SE | IT | |
| 6. | TE / BE | Comp | 10 – 12 Mar |
| 7. | TE / BE | IT | |

3. It will be advisable for locals/day scholars to stay at home. Those who have applied Hostel accommodation and not allotted due to shortage of accommodation and other reasons (list available on on AIT website) will make their own arraignment outside. Those who are day scholar / making their own arrangement to stay outside will inform details including their address to Joint Director and their respective warden / counselor through email by within a week of joining classes.

4. While reporting to college all students to produce RT-PCR Test Report, which is three days prior to commencing the journey.

5. Students are also required to obtain consent from the parents, as per UGC circular dated 06 Nov 2020 as per format attached.

6. Installation of Aarogya Setu App on your mobile is mandatory.

7. Changes if any from SPPU will be communicated to students. Also all students will to visit college and SPPU website regularly for getting updated information.

(Dr. B.P. Patil)
**Principal**

**Copy to –**

Chairman
Director
Jt Director } For information please.

All HOD
Registrar
All Hostel } For information and needful action.

HOD IT - forward to all students on email & publish on college website.

ARMY INSTITUTE OF TECHNOLOGY
Dighi Hills, Pune 411015

## Parental Consent Form - COVID -19

Instructions:

- We understand your concern towards your child during this pandemic situation, as per UGC Regulation University has decided to mandate the physical classes for the students, hence you have to send us the consent letter signed by you (parents) within next three days to respective HOD.
- Please fill up the form clearly in Capital letters
- Then click a picture and forward to HOD email address or
- WhatsApp to your Counsellor / Class Teacher

Student Name ____________________

Register Number ____________________ Roll No. ____________

Year (Branch) ____________________

Permanent Address ____________________

____________ State ____________ Postal Code ____________

E-mail ____________________ Mobile ____________

Date of birth ______/______/______ Age ____________

Emergency Contact Details: Parent /Guardian

Name ____________________ Relationship ____________

Tel no (home) ____________________ (mobile/work) ____________

**Medical information:**

Has your son/daughter reported positive for COVID19 in the past?

If yes, please specify ____________________ Date ____________

Name of Doctor ____________________ Tel No ____________

*I hereby consent and permit my son/daughter to attend the physical classes at the Institute campus in AIT, Pune

*I hereby consent my son / daughter to stay in hostel at AIT, Pune.

*I hereby state that I am aware of the risks associated with travelling and non-conformance to prevention of Covid-19 norms as declared by the Govt of India from time to time.

*I consent to abide by the testing & isolation protocol norms of the Govt of India, if my Son/Daughter is detected to have any symptoms related to the COVID-19 virus.

*I also consent to provide my contact details i.e. my email id and mobile phone to be given to the authorities to be used in the event of for any medical emergency of my son/daughter.

I hereby attest that all the information provided by me in this form is true to the best of my knowledge

Dated ____________________ Signature ____________________

Relationship ____________________ Full Name ____________________

Email address ____________________ Mob number ____________________

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. ३४/२०२१

**विषय : विद्यापीठातील शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था येथे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे नियमित अध्यापनाचे वर्ग सुरू करण्याबाबत.**

शासनाने, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र.६/विशि–३ दि. ०३ फेब्रुवारी, २०२१ अन्वये राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरू करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. तसेच महाविद्यालयांच्या सुरक्षा अंकेक्षणाबाबत मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पत्र दि. ०३ फेब्रुवारी, २०२१ अन्वये निर्देश दिलेले आहेत. सोबत शासन निर्णय व शासन पत्राची प्रत जोडत आहे.

'कोव्हिड–१९ (कोरोना)' मुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे मार्च २०२० पासून विद्यापीठ विभाग व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे नियमित वर्गातील अध्यापन बंद आहे. विद्यार्थी हित लक्षात घेता, विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयामध्ये कोव्हिड प्रतिबंधात्मक सर्वसाधारण उपाययोजना करून नियमित वर्गातील अध्यापन सुरू करण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोग व शासनाने निर्देश दिलेले आहेत. सोबत विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. ०५ नोव्हेंबर, २०२० अन्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वाची प्रत जोडत आहे.

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वे व शासनाने उपरोक्त परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करून तसेच स्थानिक प्राधिकरणांची सहमती घेऊन विद्यापीठातील शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था येथिल प्रवेशित विद्यार्थ्यांचे नियमित अध्यापनाचे वर्ग दि. १५ फेब्रुवारी, २०२१ पासून सुरू करण्यात यावेत.

4/2/2021.
उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ )
संदर्भ क्र. शै.प्रवेश/७२६ )
दिनांक : ०४/०२/२०२१ )

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :–**

मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये
मा. संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था

**प्रत माहितीसाठी :–**

मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे
मा. सह संचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, पुणे
मा. कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

Desktop/vidita/circulars

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण २०२१/प्र.क्र.६/विशि-३,**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: ०३ फेब्रुवारी, २०२१.

संदर्भः- (१) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.५ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचना.
(२) दि.१ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावनाः-

कोव्हिड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे संपूर्ण देशात लॉकडाऊन घोषित करण्यात आल्यामुळे शैक्षणिक संस्थांचे दैनंदिन कामकाज मार्च, २०२० पासून विस्कळीत झाले आहे. तथापि, राज्यातील कोव्हिड-१९ बाधित रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झालेली असून सद्यस्थितीत ही साथ नियंत्रणाखाली आल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमध्ये कोव्हिड प्रतिबंधात्मक सर्वसाधारण उपाययोजना करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणीक वर्ष ऑफलाईन पध्दतीने नियमित वर्ग सुरु करणे विद्यार्थ्यांच्या हिताचे राहील. त्यानुसार राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

परिपत्रकः-

१. राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग दिनांक १५ फेब्रुवारी, २०२१ पासून सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्यातील प्रतिबंधित प्रक्षेत्रातील विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये ही ज्या आयुक्त, महानगरपालिका/नगरपालिका किंवा जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचे अंतर्गत येतात, त्यांच्याशी संबंधित विद्यापीठाने विचारविनिमय करुन, कोव्हिड-१९ च्या आजाराचा स्थानिक पातळीवरील प्रादुर्भाव व स्थानिक परिस्थिती व आरोग्यविषयक पायाभूत सुविधांची उपलब्धता या बाबी विचारात घेऊन, विद्यापीठे व महाविद्यालये सुरु करुन नियमित वर्ग घेण्याकरिता आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत संबंधित विद्यापीठे व महाविद्यालयांनी आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी. याप्रकरणी संबंधित विद्यापीठांनी स्थानिक प्राधिकरणांची सहमती घेऊन महाविद्यालये सुरु करण्याच्या सूचना निर्गमित कराव्यात.

३. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.५ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, जागेची उपलब्धता पाहून, ५०% पर्यंत विद्यार्थ्यांना रोटेशन पध्दतीने वर्गात प्रवेश देण्यात यावा.

४. कोव्हिड-१९ बाबत केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.५ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच दि.१ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सोबत जोडण्यात येत आहे. त्यानुसार सर्व संबंधित विद्यापीठांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२१०२०३१७५७४२४५०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Pravinkumar
Gulabrao Pawar

Digitally signed by Pravinkumar Gulabrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=[illegible], serialNumber=[illegible], cn=Pravinkumar Gulabrao Pawar
Date: 2021.02.03 18:03:39 +05'30'

**( प्रविणकुमार पवार )**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. मा.सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. मा.कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे
१०. मा.कुलगुरु, सर्व अभिमत विद्यापीठे
११. मा.कुलगुरु, सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे
१२. मा.कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड
१३. मा.कुलगुरु, कवि कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर
१४. मा.कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
१५. सर्व महानगरपालिका आयुक्त

१६. सर्व जिल्हाधिकारी

१७. प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१८. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, पुणे

१९. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई

२०. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई

२१. निवडनस्ती (विशि-३).

## मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली दि.१ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्याच्या अनुषंगाने राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरुंसोबत दि.१ फेब्रुवारी, २०२१ रोजी दुपारी १.०० वा. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु तसेच प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई हे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित होते. तसेच संचालक, उच्च शिक्षण, पुणे व कार्यासन अधिकारी, विशि-३ हे प्रत्यक्ष उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी सर्व कुलगुरुंना विद्यापीठे व महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्याबाबत आपली मते मांडण्यास सांगितले. त्यास अनुसरुन सर्व कुलगुरुंनी नियमित वर्ग सुरु करण्यास अनुकूलता दर्शविली.

मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.५ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यार्थ्यांची सुरक्षितता व आरोग्य विचारात घेऊन, प्राप्त परिस्थितीत राज्यामधील विद्यापीठे व महाविद्यालये सुरु करण्यास तत्वतः मान्यता देता येईल, असे मत व्यक्त केले.

या बैठकीत सविस्तर विचारविनिमय केल्यानंतर पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले:-

१. राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्याबाबत राज्यातील सर्व विद्यापीठांचे एकमत झाले.

२. वसतीगृहे टप्प्या-टप्प्याने सुरु करण्याकरिता मार्गदर्शक तत्त्वे किंवा मानक कार्य प्रणाली (SOP) विद्यापीठांनी तयार करावी.

३. विद्यार्थ्यांकरिता परीक्षा विद्यापीठांनी ऑनलाईन/ऑफलाईन अशा पध्दतीने विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार घेण्यात याव्यात.

४. चालू वर्षी कोव्हिड-१९ मुळे प्रत्येक विद्यापीठांच्या आदेशातील (Ordinances) तरतुदींनुसार विद्यार्थ्यांची उपस्थिती ७५% बंधनकारक नसावी. विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याबाबत सक्ती करण्यात येऊ नये.

५. शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांची कोव्हिड-१९ करिता टेस्ट करण्याच्या आवश्यकतेबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांच्याशी विद्यापीठांनी चर्चा करावी.

६. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे पदवी/ पदव्युत्तर अभ्यासक्रम किती कमी करावयाचा याबाबत त्या-त्या विद्यापीठांनी निर्णय घ्यावा.

७. वसतीगृहे/ महाविद्यालये अनेक दिवस बंद अवस्थेत असल्याने त्यांचे इलेक्ट्रिक/ सेफ्टी ऑडिट करुन घेण्यात यावे.

तदनंतर सर्व संबंधितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर करण्यात आले.

*********